पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 07/03/2020 (शनिवार)
(सकाळ)

---

## घरफोडी

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 02 किमी अंतरावर सुपरटाऊन क्रांद्री कन्हान येथे दिनांक 05/03/2020 चे 09.00 वा. ते 09.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. सिमा रूशीजी देशमुख, वय 30 वर्ष, रा. सुपरटाऊन कन्हान, या घराला कुलूप लावुन सासु नामे– नेमबाई यांच्या कडे आरोम करण्याकरिता गेल्या होत्या. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या घराचे कुलूप तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने लोखंडी आलमारीतील लॉकर मध्ये ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने कि. 20,000/–रू., होमथियेटर कि. 10,000/–रू. व नगदी 10,000/–रू. असा एकुण कि. 40,000/– रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक जावेद शेख 9403692766 हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 06 किमी अंतरावर गोंडेगाव बसस्टॉप ते टेकाडी येथे दिनांक 04/03/2020 चे 18.00 वा. ते दिनांक 05/03/2020 चे 08.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– पंचभाई खुशाल टेकाम, वय 23 वर्ष, रा. पाधराणी माळ ते अर्जुना मोहरगाव जि. गोंदिया यांनी भारत ईलेक्ट्रीक कोन्ट्रेल मॅनीफॅक्चर प्रायव्हेट लिमीटेड चा पोल लावुन त्यावर ईलेक्ट्रीक तार लावण्याचा ठेका घेतला होता. दरम्यान अज्ञात आरोपीने 20 ते 22 पोल वर लावलेली 11 के.वी. अंदाज 447 किमी वजनाची किं 40,000/– रु. ची ॲल्युमीनीअम तार चोरी केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार जावेद शेख 9403692766 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर